नियमित दिवाणी दावा क्र.७५५/२०२१
गोविंद वि शेषेराव इतर
नि.क्र.३३/ क (सोबत)

वादी तर्फे साक्षीदार क्र.२

**<u>उलट तपासणी प्रतिवादी क्र.३ तर्फे वकील श्री. एच.व्ही. गायकवाड यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मी वाद मिळकतीच्या लगतचा शेतकरी आहे. माझ्या जमिनीची मोजणी करण्याची मला गरज वाटत नाही. शेषेराव यांनी अरुणाबाईविरुध्द सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अरुणाबाईने शेषेराव व इतर यांच्याविरुध्द पुर्वी दावा दाखल करुन तिची जमीन मोजून घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा प्रकरणाचा निकाल लागून अरुणाबाईच्या जमिनीच्या हद्दी खुणा कायम झाल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाच्या वेळी अरुणाबाई व इतर जमिनधारकांच्या जमिनीची मोजणी होऊन त्यांच्या जमिनीच्या हद्दी खुणा कायम करण्यात आल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अरुणाबाई यांनी दाखल केलेला दावा हा प्रस्तुत दाव्यातील इतर प्रतिवादी व वादीविरुध्द दाखल केला होता. गोविंदच्या मालकीच्या १ हे. ५ आर जमिनीवर कोणीही अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोविंदच्या जमिनीमधून रस्ता व नाला गेलेला आहे. सदर नाला व रस्ता हा २० बाय ४० फुट लांब आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्ता व नाल्यामध्ये गोविंदची अंदाजे पाऊण एकर जमीन गेलेली आहे. गोविंदच्या जमिनीलगत शासनाची गायरान जमीन आहे. गोविंदने शासनाला पक्षकार केलेले नाही. गोविंदच्या जमिनीला लागून अरुणाबाईची जमीन नाही. माझ्या शपथपत्रामध्ये गोविंदच्या जमिनीच्या पुर्वेला अरुणाबाईची जमीन असल्याचे नमूद केले असून ती चुकीची नमूद केली आहे व गोविंदच्या जमिनीच्या पुर्वेला शेषेरावची जमीन आहे. मी शेषेरावच्या जमिनीसंदर्भात साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>प्रतिवादी क्र.१ व ५ तर्फे वकील श्री. एस.के. कस्तुरे व प्रतिवादी क्र.४ तर्फे वकील श्री. एस.के. मोरे यांचा वारंवार पुकारा करता गैरहजर.</u>**

सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.07.23 16:57:52 +0530

दि.२३/०७/२०२५

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.